Scan QR code to visit... Epaper Portal

दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www.sahyandrinews.com

Scan QR code to visit... Epaper Portal

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक २७७ • Title - Code :- MAHMAR49513 • मंगळवार दि.१६ जुलै २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

## थोडक्यात

### विशाळगड अतिक्रमणाला जातीय रंग देऊ नका

**कोल्हापूर**–छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचा साक्षीदार असलेल्या विशाळगडावर झालेले अतिक्रमण हटवण्यासाठी करण्यात आलेल्या आंदोलनाला हिंसक वळण लागले होते. राज्यभरातून आलेल्या शिवभक्तांनी गजापूर हद्दीतील अनेक घरांवर दगडफेक केली. तसेच त्या परिसरात असलेल्या वाहनांची जाळपोळही करण्यात आली.आता याप्रकरणी माजी खासदार संभाजी राजे छत्रपती यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संभाजीराजेंसह ५०० जणांवर शाहूवाडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. त्यानंतर संभाजीराजे हे शाहूवाडी पोलिस ठाण्यात दाखल झाले. सुमारे दीड तास चर्चा झाली. त्यानंतर संभाजीराजे यांनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले की, माझ्यावर गुन्हा दाखल झाला की नाही याची माहिती मला पोलिसांनी दिली नाही. परंतु मी पोलिसांना सांगितले की, विशाळगड प्रकरणावरुन तुम्ही शिवभक्तांना जबाबदार धरू नका, त्याचा सर्व दोष माझ्यावर लावा, पण पोलिसांनी कोणतीही भूमिका घेतली नाही.

### भुजबळांनी परतीचे प्रयत्न केले तरी घेणार नाही

**मुंबई**–छगन भुजबळ यांची दुटप्पी भूमिका आहे. त्यांनी कितीही परतीचे प्रयत्न केले तरी त्यांना पुन्हा पक्षात प्रवेश मिळणार नाही, ही आमच्या पक्षाची भूमिका आहे, असे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते तथा राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी सोमवारी स्पष्ट केले. देशमुख यांच्या या विधानामुळे भुजबळांनी स्वगृही परतण्यासाठी शरद पवारांची भेट घेतली का? अशी चर्चा सुरू झाली आहे.मंत्री छगन भुजबळ यांनी सोमवारी सकाळी शरद पवार यांची भेट घेतली. या भेटीमुळे राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ माजली असताना अनिल देशमुख यांनी वरील स्पष्टीकरण दिले आहे. ते म्हणाले की, छगन भुजबळ आता दुटप्पी भूमिका घेत आहेत. एकीकडे बारामतीला टीका करायची आणि त्यानंतर शरद पवारांची भेट घेऊन त्यांचे मार्गदर्शन मागायचे. ही दुटप्पी भूमिका आहे. काल त्यांनी शरद पवारांवर जोरदार टीका केली. त्यांनी परतीचे प्रयत्न केले तरी त्यांना परत घ्यायचे नाही ही आमच्या पक्षाची ठाम भूमिका आहे.

### बाहेर बोलता तेवढे कॅबिनेटमध्ये बोलला असतात, तर तुमची ख्याती वृद्धिंगत झाली असती

**मुंबई**–बाहेर बोलता तेवढे कॅबिनेटमध्ये बोलला असतात, तर तुमची ख्याती वृद्धिंगत झाली असती, असा टोला राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी छगन भुजबळ यांना लगावला आहे. बारामतीमध्ये रविवारी अजित पवार गटाची सभा झाली. यामध्ये भुजबळ यांनी मराठा आरक्षणावरून शरद पवार यांच्यावर गंभीर आरोप केले होते. या आरोपांना आव्हाड यांनी आज जोरदार प्रत्युत्तर दिले.भुजबळसाहेब आपणही बाहेर जेवढे विरोधात बोलता, तेवढेच कॅबिनेटमध्ये बोलले असते, अन् कॅबिनेटला निर्णय घ्यायला लावला असता, ती आपल्यात क्षमता आहे किंवा मंत्रिपदाचा राजीनामा दिला असता तर लोकांच्या प्रश्नावर लढणारा नेता म्हणून म्हणून आपली ख्याती आहे ती अजून वृद्धिंगत झाली असती, अशी टोलेबाजी आव्हाड यांनी केली.भुजबळ यांच्या याच आरोपांना आव्हाड यांनी ट्विट करत प्रत्युत्तर दिले आहे. ''भुजबळसाहेब तुम्ही आदरणीय पवारसाहेबांबाबत केलेले वक्तव्य आम्ही सर्वांनीच ऐकले. गेली दोन वर्षे राज्यातील शिंदे फडणवीस सरकार आरक्षणाच्या प्रश्नावर सर्वच बाजूंना केवळ खेळवत आहे. आरक्षणाच्या प्रश्नावर सर्वपक्षीय बैठका घ्यायच्या मात्र अंतिम तोडगा काहीच काढायचा नाही, चर्चांमधे सर्वांना गुंतवून ठेवून या प्रश्नांचे घोंगडे भिजत ठेवायचे, हिच या सरकारची रणनीती आहे. परवाची आरक्षण विषयक सर्वपक्षीय बैठक हा देखील सरकारचा त्यापैकीच एक प्रकार होता'', असे आव्हाड म्हणाले.

# २१ जुलै रोजी पुण्यात ५ हजार भाजप पदाधिकाऱ्यांचे अधिवेशन

## केंद्रीय मंत्री अमित शहा, नितीन गडकरी करणार मार्गदर्शन



नागपूर (वृत्तसंस्था)–विधानसभा निवडणुकीपूर्वी भारतीय जनता पार्टीचे सर्व पदाधिकारी १९ नेत्यांच्या नेतृत्त्वातील संवाद यात्रेच्या माध्यमातून राज्यातील कानाकोपऱ्यात पोहचणार असल्याची माहिती भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष आमदार चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. येत्या २१ जुलै रोजी पुणे येथे महाराष्ट्रातील पाच हजार भाजपा पदाधिकाऱ्यांचे अधिवेशन होणार असून त्यात भाजपाचे नेते केंद्रीय मंत्री अमित शाह, नितीन गडकरी यांच्या उपस्थितीत संवाद यात्रेविषयी अंतिम रूपरेषा तसेच तारीख पक्की ठरणार आहे अशी माहिती भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी माध्यमांशी बोलताना दिली.
पुण्यात होणाऱ्या अधिवेशनात केंद्रीय मंत्री अमित शहा, नितीन गडकरी यांच्यासह उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राज्यातील सर्व केंद्रीय राज्यमंत्री तसेच प्रदेशातील सर्व प्रमुख पदाधिकारी उपस्थित राहणार आहे.महाराष्ट्रातील भाजपाचे १९ वरिष्ठ नेते संवाद यात्रेत सहभागी होतील. ही यात्रा सर्व ४८ लोकसभा, सर्व विधानसभा तसेच जिल्हा परिषद व पचायत समिती गट आणि नगर पालिका क्षेत्रात पोहचेल.पंतप्रधान नरेंद्र मोदी याच्या सरकारने तिसऱ्या टर्ममध्ये घोषित केलेली कामे व महायुती सरकारने अर्थसंकल्पात जाहीर केलेल्या कामाची माहिती, सरकारने घेतलेले निर्णय जनसामान्यांपर्यंत पोहचविणार आहोत. समाजातील सर्व घटकांना केंद्र व राज्य सरकारच्या योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न केला जाणार आहे. या संवाद यात्रेचा समारोप विधानसभानिहाय होणार आहे. २१ जुलैच्या पुणे अधिवेशनापूर्वी १९ जुलै रोजी मुंबईत संघटनात्मक बैठक होणार असून महाराष्ट्र विधानसभा पक्ष प्रभारी भूपेंद्र यादव आणि सहप्रभारी अश्विनी वैष्णव ही बैठक घेणार असल्याचेही बावनकुळे म्हणाले.
आरक्षण विषयासंदर्भात मुख्यमंत्र्यांनी बोलाविलेल्या सर्वपक्षीय बैठकीवर विरोधी पक्षांच्या नेत्यांनी बहिष्कार टाकून योग्य केले नाही. मराठा आणि ओबीसी समाजाच्या हितासाठी ही बैठक होती. विरोधकांची भूमिका निंदनीय आहे. अशी भूमिका महाराष्ट्राच्या हिताची नाही. विरोधक जातीपातीचा राजकारण करीत आहे हे जनतेला दिसले. चुकून महाराष्ट्रात मविआ सरकार आले तर लोकांच्या लाभाच्या योजना बंद होतील. महाराष्ट्रातील जनतेला डबल इंजिन सरकार हवे आहे.

## प्रा.मनिष उत्तरवार यांनी स्विकारला संचालक (न.न.व.सा.)पदाचा कार्यभार

**गडचिरोली । प्रतिनिधी**

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली संचालित नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य विभागाच्या संचालकपदी प्रा. मनिष उत्तरवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी शुक्रवार, दि. १२ जुलै २०२४ रोजी संचालक पदाचा पदभार स्विकारला असून सदर पदाचा कार्यभार हाती घेतला आहे.
या संदर्भात गोंडवाना विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरु तथा प्र–कुलगुरु आदरणीय डॉ. श्रीराम कावळे, सन्माननीय कुलसचिव डॉ. अनिल हिरेखन तसेच कर्मचारी वृंदांनी प्रा. मनिष उत्तरवार यांचे अभिनंदन करुन स्वागत केले.
तत्पुर्वी प्रा. उत्तरवार यांनी २०१२–१५ दरम्यान अभियांत्रीकी विद्याशाखेचे अधिष्ठाता तसेच २०१८–२३ दरम्यान संचालक (न.न.व.सा) म्हणून विद्यापीठात सेवा प्रदान केलेली होती. त्यांच्या दिर्घकालीन बहुआयामी कार्यानुभवाच्या आधारावर तसेच विद्यापीठाच्या शिर्ष नेतृत्वातंर्गत गोंडवाना विद्यापीठात येणाऱ्या काळात देशपातळीवर नवी उंची व लौकिक प्राप्त करु असा विश्वास व्यक्त केला.



## कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी कलम ३६ लागू

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

मोहरम हा उत्सव मुस्लीम धर्मीय व काही प्रमाणात हिंदु समाजातर्फे साजरा करण्यात येतो. जिल्ह्यात १६ व १७ जुलै रोजी मोठया प्रमाणात मिरवणुका व धार्मिक कार्यक्रम साजरे करण्यात येणार असल्याने जिल्हयात कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने तसेच आषाढी एकादशी निमित्त १८ जुलै च्या मध्यरात्रीपर्यंत कलम ३६ चे पोटकलम अ ते फ लागू करण्यात आले आहे.
मुंबई पोलिस कायद्यान्वये खालील नमुद केल्याप्रमाणे जिल्हा पोलिस अधिक्षक मुम्मका सुदर्शन यांनी सार्वजनिक ठिकाणी वागणुकीबाबत, वाद्य वाजविणेबाबत, सभेचे आयोजन, मिरवणुक काढण्याबाबत व मिरवणकीचे मार्ग निश्चित करणेबाबत, लाऊडस्पिकर वापरण्याबाबत योग्य निर्बंध व निर्देश देण्याचे अधिकार चंद्रपूर जिल्हयातील सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना प्रदान केले आहे. मिरवणुक व सभेच्या ठिकाणी त्यातील लोकांचे वागणुकीबाबत योग्य निर्देश देण्याचे अधिकार, मिरवणुकीच रस्ता व वेळ निर्धारित करणे तसेच धार्मिक पुजा स्थानाचे जवळ लोकांचे वागणुकीचे निर्बंध घालण्याचे अधिकार, मिरवणुकीस बाधा होणार नाही याबाबतचे आदेश तसेच धार्मिक पुजा स्थानांचे जवळ लोकांचे वागणुकीबर निर्बंध घालण्याचे अधिकार, लाऊडस्पिकर वाजविण्याबर निर्बंध तसेच मर्यादा घालण्याचे अधिकार, कलम ३३ ,३५,३७, ते ४०,४२,४३, व ४५ देण्यात आले आहेत.सदर आदेश लागू असताना सभा, मिरवणुक वाद्य वाजविणे, लाऊडस्पिकर वाजविणे, मिरवणुकीत नारे लावणे, मिरवणुकीचा रस्ता व वेळ निर्धारित करण्यासाठी संबंधित ठाणेअंमलदार यांची परवानगी घेण्यात यावी. सर्व बाबतीत पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी तसेच त्यांचेपेक्षा कनिष्ठ दर्जाचे सर्व पोलीस अधिकारी यांनी दिलेल्या निर्देशाचे पालन करावे. सदरआदेश १८ जुलैच्या मध्यरात्री पर्यंत अंमलात राहील, असेही आदेशात नमुद आहे.



महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे राज्य सरचिटणीस तथा महाराष्ट्र नवनिर्माण शेतकरी सेनेचे प्रदेश अध्यक्ष संतोष गणपतराव नागरगोजे यांना प्रकाशपर्व विशेषांक देताना संपादक आशिष घुमे

## आरोग्य सेवक पदभरतीचे प्रवेशपत्र संकेतस्थळावर उपलब्ध

**गडचिरोली**–जिल्हा परिषद, गडचिरोली अंतर्गत आरोग्य सेवक, अंगणवाडी पर्यवेक्षीका या पेसा संवर्गातील बिगरपेसा क्षेत्रात रिक्त असलेली पदे भरण्याकरीता आयबिपीएस कडून दिनांक १८ जुलै ते ३० जुलै या कालावधीमध्ये परिक्षा घेण्यात येणार आहेत. सदर परिक्षेच्या प्रवेशपत्रकरीता डाऊनलोड लिंक व परिक्षेकरीता असणाऱ्या सुचनांची माहिती पुस्तिका जिल्हा परिषद, गडचिरोलीच्या ु.सिरवलहळीश्रळ.ळप या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेले आहे. उमेदवारांनी प्रवेशपत्र डाऊनलोड करुन घ्यावे व त्यावरील सुचनांचे काटेकोरपणे पालन करुन दिलेल्या परिक्षा केंद्रावर नियोजित वेळेवर उपस्थित रहावे, असे मुख्य कार्यकारी अधिकारी आयुषी सिंह यांनी कळविले आहे.

## शेतकरी संकटात , सिंचनासाठी तलावाचे पाणी सोडा–संतोषसिंह रावत

**मुल । प्रतिनिधी**

यावर्षीच्या २०२४ च्या चालू खरीप हंगामाची पूर्ण तयारी शेतकऱ्यांनी केली असून मागील पंधरा दिवसांपूर्वीच पावसाळा सुरू होताच रोवण्यासाठी असंख्य शेतकऱ्यांनी धानाचे पऱ्हे टाकले तर सर्वसाधारण व गरीब असलेल्या शेतकऱ्यांनी रोवणीला खर्च जास्त येते म्हणून अनेक शेतकऱ्यांनी धान आवत्या टाकले आहेत. परंतु हंगाम सुरु झाल्यापासून तर आजपर्यंत मुल सावली,पोभूर्णा तालुक्यात फक्त थोड्या प्रमाणात पाऊस थिरकला परंतु धान पिकाला लागणारा पाऊस अजूनही पडला नाही. आजच्या स्थितीत,खाजगी गाव तलाव,मामा तलाव,नदी,छोटे नाले,बोड्या,पूर्णतः कोरडे पडले आहे. तरी देखील पाऊसाचा पत्ताच नाही. त्यामुळे अती तीक्ष्ण व गर्मीच्या उकाड्यामुळे पेरणी केलेले धानाचे पऱ्हे, आवत्या सुकायला लागले असून पिवळसर पडत आहेत. याकरिता शेतकरी चिंतेत सापडला आहे. जर येत्या चार पाच दिवसात पेरणीला पाणी दिले नाही तर मात्र हंगाम शेतकऱ्यांच्या हातून गेल्याशिवाय राहणार नाही. अशी वेळ शेतकरी बांधवांवर आलेली आहे. तसेच पऱ्हे रोवणी करीता आले असताना पाण्या अभावी अडून बसले आहेत. दोन्ही तालुक्यातील शेतकऱ्यांचे धान पिकाची आशा सोडली असल्याचे बोळून दाखविले आहे. त्यामुळे सावली - मुल दोन्ही तालुक्यातील शेतकऱ्यांना वाचवायचे असेल तर तात्काळ आसोला मेंढा तलावाचे पाणी सोडावे अशी मागणी सावली तालुक्यातील सावली, खेडिसह पूर्ण गावे व मुल तालुक्यातील राजगड, फिस्कुटी, वीरई, चांदापुर, जूनासुरला, गडीसुरला, नवेगाव (भूजला), बेंबाळ, नांदगाव, बोंडाळा,चक दुगाळा , येरगाव, चक् बेंबाळ, बोरचांदली, चीचाला, येरगाव, इत्यादी गावातील शेतकऱ्यांनी कांग्रेस नेते सी.डी.सी.सी बँकेचे अध्यक्ष व माजी.जी.प.अध्यक्ष संतोष सिंह रावत यांचे कडे केली आहे.



सावली तालुका पूर्ण, तर मुल तालुक्यातील काही गावे निस्तार हक्का प्रमाणे आसोला मेंढा तलाव प्रकल्प याचे लाभधारक आहेत. तलावातील पाणी सोडण्याची जबाबदारी आसोला मेंढा तलाव नूतनीकरण उपविभाग क्र.६ उपअभियंता) यांचेकडे आहे. मुल - तलाठी साजा क्रमांक १२ मंडळ खेडी मध्ये समाविष्ट असलेल्या शेतकऱ्यांच्या शेतजमिनी, खेडी ते गोंडपीपरी रस्त्याच्या दोन्ही बाजूला टेल पर्यंत शेतीला पाणी पुरवठा व्हायला खूप वेळ लागतो.करीता त्वरित तलावाचे पाणी सोडावे अशी मागणी शेतकरी बांधवांच्या वतीने संतोषसिंह रावत यांचेकडे केली. जर का येत्या दोन दिवसात तलावाचे पाणी सोडले नाही तर शेतकऱ्यांसह आंदोलन करण्याचा इशारा देखील रावत यांनी दिला आहे.
खेडी साजातील मुख्य हायवे रस्त्याच्या दोन्ही बाजूला असलेल्या अनेक शेतकऱ्यांना आसोला मेंढा प्रकल्प नूतनीकरण उपविभाग क्रमांक ६ उपअभियंता सावली यांनी पाईप लाईन टाकण्याचे व शेतात वाल लावण्याचे आश्वासन दिले होते.परंतु अधिकाऱ्यांनी तेही पूर्ण केले नाही. त्यामुळे या हंगामात अनेक शेतकऱ्यांना धान पीक घेता येणार नाही असे चिन्ह दिसून येत आहेत. करीता याही शेतकऱ्यांच्या शेतीला तलावाचे पाणी कसे देता येईल याचाही विचार करावा असे संतोषसिंह रावत यांनी म्हटले आहे.

## विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागातर्फे जॉब प्लेसमेंटचे आयोजन ; ३१ विद्यार्थ्यांची प्राथमिक निवड

**गडचिरोली । प्रतिनिधी**

प्रत्येक विद्यार्थ्याला कौशल्याधिष्ठित व रोजगाराभिमुख शिक्षण देण्यासाठी गोंडवाना विद्यापीठ प्रयत्नशील असून विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. प्रशांत बोकारे यांनी कायमच विद्यार्थ्यांच्या कौशल्याधारीत शिक्षणावर भर दिला आहे. विद्यार्थ्यांच्या कौशल्याचा विकास करुन शिक्षण दिल्यास तो रोजगाराभिमुख होईल व त्याचे जीवनमान उचांवण्यास मदत मिळेल.
गोंडवाना विद्यापीठाच्या सेंट्रल प्लेसमेंट सेलद्वारे शनिवार, दि. १३ जुलै २०२४, रोजी विद्यापीठ सभागृहात जॉब प्लेसमेंटचे आयोजन करण्यात आले होते. सदर उपक्रमात पुणे येथील मल्टीनॅशनल बेकर्ट लिमीटेड कंपनीतर्फे उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या. यामध्ये १२३ उमेदवारांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ३१ विद्यार्थ्यांची प्राथमिक स्वरुपात निवड करण्यात आली. फक्त शिक्षणाचा दर्जा उंचावणे हाच हेतू न ठेवता, त्यांना रोजगार मिळायला हवा या उद्देशाने जॉब प्लेसमेंट उपक्रम विद्यापीठात राबविण्यात आला. या उपक्रमाच्या माध्यमातून येथील उमेदवारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. यावेळी विद्यापीठाच्या सेंट्रल प्लेसमेंट सेलचे समन्वयक डॉ. अनिरुद्ध गचके, ट्रेनिंग अँन्ड प्लेसमेंट ऑफीसर डॉ. उत्तमचंद कांबळे, पदव्युत्तर शैक्षणिक रसायनशास्त्र विभागाचे प्लेसमेंट ऑफीसर डॉ. केशब बैरागी, तसेच रसायनशास्त्र विभागाचे डॉ. स्नेहा वनकर, डॉ. सुषमा बनकर, डॉ. प्रशांत ठाकरे तसेच कंपनीचे व्यवस्थापक सुनील चौहान, अमोल बोचरे विशाल खोट, अकुंश दौंडकर आदी उपस्थित होते.




# आनंदधाम पंढरपूर आणि पांडुरंग!

**असे म्हटले जाते, की पंढरपूर यात्रा ही जगातील सर्वात मोठी आणि सर्वात जुनी यात्रा आहे. ज्यात भक्तगण या विशेष प्रसंगी जमतात आणि दिंडीमध्ये भाग घेतात. हा प्रवास सुमारे अडीचशे किमी आहे. या पंढरपूर आषाढी एकादशी वारी– पंढरपूर वारीचे नावही लंडनच्या वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्डमध्ये समाविष्ट झाले आहे. आनंदधाम पंढरपूर व पांडुरंगाचे गुणगान वाचा श्री कृष्णकुमार आनंदी–गोविंदा निकोडे गुरूजी यांच्या या लेखातून... संपादक.**

विठ्ठलभक्तांचे माहेर पंढरपूर ही अशी जागा आहे, जेथे जगातील बहुतेक भक्त एका दिवसात देवाला भेटायला येतात. या कारणास्तव या अनोख्या वारी अर्थात दिंडीचे नाव वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंदले गेले आहे. या दिंडी यात्रेच्या सुरूवातीपासूनच ही यात्रा दरवर्षी सातत्याने होत असते, इतकी वर्षे गेली पण ही यात्रा कधीच कमी झाली नाही. या प्रवासात कोणताही अडथळा येत नाही. दरवर्षी पन्नासहून अधिक संतांच्या पालख्या पंढरपूरला विठोबाच्या दर्शनासाठी येतात. जून–जुलै महिन्यात– आषाढी शुक्ल पक्षातील आषाढी एकादशीचा सण महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. हा महाराष्ट्राचा धार्मिक उत्सव आहे. या उत्सवाच्या वेळी परमेश्वराच्या पालखीची अतिशय सुंदर सजावट केली जाते. त्यानंतर परमेश्वराची पादुका ठेवली जाते, त्यानंतर सर्व लोक एकत्र जमून बाहेर निघतात आणि या प्रवासादरम्यान ते परमेश्वराच्या नावाची सर्व गाणी, भजन व भक्तिगीते गात त्यांच्या तालावर नाचतात. या सर्वांनी बनवलेल्या गटाला दिंडी असे म्हणतात. बघा गौळण–

**चुंबळ मोत्यांची,**
**वर पाण्याचा घडा गं।**
**कृष्ण देवाने,**
**हळुच मारला खडा गं।।**

असे म्हटले जाते, की पंढरपूर यात्रा ही जगातील सर्वात मोठी आणि सर्वात जुनी यात्रा आहे. ज्यात भक्तगण या विशेष प्रसंगी जमतात आणि दिंडीमध्ये भाग घेतात. हा प्रवास सुमारे अडीचशे किमी आहे. या पंढरपूर आषाढी एकादशी वारी– पंढरपूर वारीचे नावही लंडनच्या वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्डमध्ये समाविष्ट झाले आहे. जेव्हा ही अनोखी दिंडी पंढरपूरच्या दिशेने काढली जाते, तेव्हा या दिंडी दरम्यान काही लोक गरीब आणि गरजू लोकांची सेवा करतात, यावरून आपण हे देखील समजतो, की देव सर्व स्वरूपात आहे. कारण देव सर्वव्यापी आहे. या प्रकारची सेवा या प्रवासामध्ये केली जाते, म्हणून त्याला सेवा दिंडी असेही म्हणतात. या दिंडी दरम्यान लोक सर्व प्रकारच्या सेवा करतात. ज्यात अमृत कलश, नारायण सेवा, रूग्णांची सेवा, खेड्यांच्या इमारतींची दुरुस्ती आदी. या आषाढी एकादशी आणि सेवा दिंडीमध्ये भाग घेणाऱ्या यात्रेकरूंचे आरोग्य पूर्णपणे निरोगी राहते, त्यांचे आयुष्य शांती आणि आनंदाने भरलेले असते. म्हणूनच–



संकलन व सुलेखन
श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी.
पोटेगावरोड, गडचिरोली,
फक्त मधुभाष– ७१३२७९६६८३.

**फुलांमध्ये फूल या गुलाबाचं।**
**वेड मला लागलं या पांडुरंगाचं।।**

महाराष्ट्रात वारकरी लोकांचा खुप मोठा समुदाय आहे आणि त्यातील बहुतेक शेतकरी मोठ्या संख्येने शेतीची कामे करणारे आहेत. शेतीत पेरणी झाल्यानंतर सर्व शेतकरी २१ दिवसांच्या या प्रवासात निघाले. सर्व धर्म आणि जातींचे लोक या यात्रेमध्ये भाग घेतात. शहाणे वयस्क सुद्धा या प्रवासाचा अनुभव घेतात. जेव्हा पंढरपूरकडे जाणारा



प्रवास सुरू होतो, तेव्हा सर्व यात्रेकरू म्हणजेच वारकरी बाह्य जगाला विसरतात आणि परमेश्वराच्या नावावर गातात आणि नृत्य करतात, केवळ परमेश्वराची आठवण करतात. या संपूर्ण प्रवासादरम्यान लोक केवळ ईश्वराच्या नावात मग्न असतात, की ते बाह्य जगास पूर्णपणे विसरतात आणि फक्त परमेश्वरावर लक्ष केंद्रित करतात. यावेळी ते आपले मन, शरीर आणि आत्मा पूर्णपणे शुद्ध ठेवतात. आत्मा पूर्णपणे एकजुटीने शुद्ध होतो आणि परमेश्वराचा आशीर्वाद प्राप्त करतो. या प्रकारचा अनुभव घेतल्यास एखादी व्यक्ती पूर्ण विकसित होते व तिला आपल्या जीवनाचे योग्य उद्देश कळते. त्यासाठी हा जीवाचा आटापिटा–

**खेळ मांडियला वाळवंटी ठाई!**
**नाचती वैष्णव भाई रे!!**

**पंढरपूरच्या विठोबा मंदिरास बरेच** लोक श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर म्हणून ओळखतात आणि हे मंदिर महाराष्ट्रातील पंढरपुरात आहे. हे महाराष्ट्राचे सर्वात महत्वाचे मंदिर आहे व प्रत्येकजण या मंदिरात विठोबा आणि त्यांची पत्नी देवी रुक्मिणी यांचे दर्शन घेण्यासाठी भेट देतो. विठोबा हा भगवान विष्णू आणि भगवान कृष्ण यांचा अवतार आहे. महाराष्ट्राच्या या मंदिराला लाखो भाविक येतात आणि भेट देतात. या मंदिरात आषाढी एकादशी व कार्तिकी एकादशीनिमित्त मंदिरात जाण्यासाठी एक भाविक गट तयार करतात. त्यांच्या गटाला दिंडी आणि भक्त संबोधित करून सर्वांना वारकरी म्हणतात, नव्हे तर सिद्ध होतात–

दिन विशेष

पाऊले चालती पंढरीची वाट!
सुखी संसाराची तोडोनिया गाठ!!

पंढरपूर चंद्रभागा नदीच्या काठावर वसलेले आहे आणि असे म्हणतात, की या नदीत स्नान केल्याने एखाद्या व्यक्तीची सर्व पापे धुवून जातात. या मंदिरात गेल्यानंतर प्रत्येक भक्तास डोळे भरून अगदी जवळून प्रभुदर्शनाची संधी मिळते. भक्त परमेश्वराच्या श्रीचरणाला स्पर्श करू शकतो. मे २०१४पासून या मंदिरात महिलांना परवानगी देण्यात आली असून मागासवर्गीय लोकांनाही पुजारी होण्याची संधी देण्यात आली आहे. हे भारतातील पहिले मंदिर आहे ज्यामध्ये मागासवर्गीय लोकांना प्रथमच मंदिराचा पुजारी होण्याची संधी देण्यात आली आहे. या मंदिराच्या काही वस्तू व इमारती पाहिल्यानंतर कळते, की हे मंदिर बाराव्या ते तेराव्या शतकापर्यंत अस्तित्त्वात आहे, परंतु आता आपण जे मंदिर पाहतो ते सतराव्या शतकानंतर डेक्कन शैलीत बांधले गेले आहे. या मंदिरास मोठे घुमट आणि कमानी दिसतात. यात्रेत आपल्याला वारीचा अनुभव, संतदर्शन, परब्रह्म विठ्ठलदर्शन आणि भक्तीचा आनंद भरभरून मिळतो, अशी इश्वरभक्तांची श्रद्धाळू धारणा आहे. त्यांना अडविण्यात कुणाची बिशाद? चला, आपणही गाऊ–

माझे माहेर पंढरी।
आहे भिवरेच्या तीरी।।

!! आषाढी पंढरपूर यात्रेच्या निमित्ताने सर्व बंधुभगिनींना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

## भोई–ढीवर समाजाच्या उत्थानासाठी शिवसेना प्रयत्नरत

**वरोरा । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे तथा प्रदेशाचे विलास चावरी यांच्या पुढाकाराने तसेच शिवसेनेचे पूर्व विदर्भ संघटक किरण पांडव त्यांच्या समन्वयातून १३ जुलै ला रविभवन नागपूर येथे विदर्भातील भोई–धीवर समाजाचा सामाजिक आर्थिक व राजकीय विकासाकरिता तथा मत्स्य व्यवसायाला चालना देणे तथा मच्छीमारांकरिता शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून देणे , तालुक्याच्या ठिकाणी वस्तीगृहाची उभारणी करणे , तलावाचे ठेके फक्त मच्छीमार संस्थांनाच मिळणे, मच्छीमारांना घरकुलाची व्यवस्था करणे , मत्स्यबीज केंद्रासाठी जागा उपलब्ध करून देणे, प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेचा लाभ घेणे , शासकीय मत्स्यबीज केंद्र मत्स्य व्यवसाय संस्थांना देने अशा अनेक विषयांवर सखोल चर्चा झाली.



या बैठकीस विलास चावरी ( प्रदेशाध्यक्ष आगरी कोळी भोई–धीवर समाज) बंडू हजारे (शिवसेना जिल्हाप्रमुख चंद्रपूर) ,नितीन मत्ते (शिवसेना जिल्हा प्रमुख चंद्रपूर)सुरज गोजे ( शिवसेना जिल्हाप्रमुख नागपूर) विनोद सासंगे (शिवसेना जिल्हाप्रमुख नागपूर) संदीप ईटकलवार (शिवसेना जिल्हाप्रमुख नागपूर) अलका पचारे (भोई समाज विदर्भ अध्यक्षा ),अमोल बावणे(जिल्हाध्यक्ष भाजप मच्छिंद्र आघाडी नागपूर), राजू डांगे (शिवसेना शहर प्रमुख वरोरा) दीपक कामतवार (वैद्यकीय सेवा चंद्रपूर) श्रीकांत खंगात ( प्रमुख वरोरा) विलास परचाके( विधानसभा समन्वयक भद्रावती) उपस्थित होते.

## ‘पोकरा’ चे प्रकल्प संचालक परिमल सिंग यांची राष्ट्रीय कृषी संशोधन प्रकल्पास भेट

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

नानाजी देशमुख कृषी संजीवनी (पोकरा) प्रकल्पाचे संचालक परिमल सिंग यांनी राष्ट्रीय कृषी संशोधन प्रकल्प येथील प्रक्षेत्रावर घेतलेल्या शून्य मशागतीवर आधारित मका कापूस पिकाच्या प्रयोगाची पाहणी केली. दरम्यान शेतकरी बंधू घेत असलेल्या शून्य मशागत तंत्रज्ञान व त्यावर आधारित शास्त्रीय पद्धतीने राष्ट्रीय कृषी संशोधन प्रकल्प येथे शून्य मशागत तंत्रज्ञानावर प्रयोग घेण्यात आले आहेत. त्यानुसार शेतकऱ्यांना शिफारशी करण्यात येणार आहेत. याविषयी प्रकल्प संचालकांनी लागवड तंत्र तणनाशकाचा वापर, सेंद्रिय कर्ब, सूक्ष्म जीवांची संख्या, पाणी व्यवस्थापन, याविषयी सविस्तर चर्चा केली.

भविष्यात हवामान बदलावर आधारित शेतीमध्ये कमीत कमी खर्चामध्ये शाश्वत उत्पादन घेण्याच्या दृष्टीने संशोधन करण्याविषयी चर्चा केली. त्याचप्रमाणे



विस्तार कार्य करत असताना येणाऱ्या अडचणींवर सांगोपां चर्चा करून त्या दृष्टीने भविष्यामध्ये कृषी विभागाच्या विविध योजनांमध्ये बदल करण्याविषयी चर्चा केली. त्याचप्रमाणे राष्ट्रीय संशोधन प्रकल्प येथे चालू असलेल्या जैविक उत्पादनाविषयी चर्चा केली व मोठ्या प्रमाणावर उत्पादन घेऊन जैविक निविष्ठा शेतकऱ्यापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करण्याचा सल्ला सिंग यांनी दिला. बाजरी पिकाच्या जैव संपृक्त वान एएसबी १२०० व एचबी १२६९ या वाणाविषयी डॉ. पवार यांनी माहती दिली. याप्रसंगी राष्ट्रीय कृषी संशोधन प्रकल्पाचे सहयोगी संचालक (संशोधन) डॉ. सूर्यकांत पवार ,पोकराचे कृषी विद्यावेत्ता विजय कोळेकर, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी प्रकाश देशमुख, केव्हीकेचे डॉ. किशोर झाडे, डॉ. चंद्रकांत पाटील. डॉ. सुरेखा कदम, डॉ. दिलीप हिंगोले, डॉ. आशिष बागडे, उपविभागीय कृषी अधिकारी धनश्री जाधव, कृषि अधिकारी पोळ, खंडागळे, बेडवाल उपस्थित होते.

## आरक्षणाच्या मुद्द्यावर पवार चर्चेस तयार

**मुंबई**–महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी राजकीय घडामोड समोर येत आहे. राज्याचे मंत्री छगन भुजबळ हे शरद पवार यांच्या भेटीसाठी पोहोचले होते. भुजबळ हे वेळ न घेता अचानक पवारांच्या भेटीसाठी पोहोचल्याने त्यांना या भेटीसाठी वेटिंग करावे लागले अशी माहिती आहे. बराच वेळ वेटिंग केल्यानंतर या दोन्ही नेत्यांमध्ये जवळपास अर्धा ते पाऊण तास चर्चा झाली. त्यानंतर या दोघांमधील बैठक आता संपन्न झाली आहे.शरद पवारांची भेट घेतल्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना छगन भुजबळ म्हणाले की, मी आज पवार साहेबांकडे सकाळी गेलो होतो. त्यांची अपॉइंटमेंट वगैरे घेतली नव्हती. सव्वादहाला मध्ये गेलो.




## भद्रावती–वरोऱ्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेसाठी सेवा केंद्राचे उद्घाटन

### भाजपा विधानसभा प्रमुख रमेश राजूरकर यांचा पुढाकार

**वरोरा । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाने महिलांसाठी नुकतीच मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना सुरू केली. या योजनेचा अर्ज भरत असतांना महिलांना योग्य अशी मदत आणि मार्गदर्शन मिळावे या उद्देशाने शनिवार, दि. १३ जुलै रोजी भारतीय जनता पार्टीचे ७५– भद्रावती–वरोरा विधानसभा प्रमुख रमेश राजूरकर यांच्या पुढाकारातून भद्रावती आणि वरोरा शहरात मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेसाठी निःशुल्क सेवा केंद्राचे उद्घाटन भाजपा जिल्हा संघटन महामंत्री संजय गजपुरे, जिल्हा महामंत्री विवेक बोढे, जिल्हा उपाध्यक्ष नरेंद्र जीवतोडे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये करण्यात आले.

ऑनलाईन सबंधित सर्व कामांसाठी या निःशुल्क सेवा केंद्राचा जास्तीत जास्त लाभ वरोरा – भद्रावती तालुक्यातील नागरिकांनी घ्यावा असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे भद्रावती – वरोरा विधानसभा प्रमुख रमेश राजूरकर यांनी केले आहे.





## माता मंदिर बांधकामासाठी भाग्यश्री आत्राम यांच्याकडून आर्थिक मदत

**अहेरी । प्रतिनिधी**

तालुक्यातील मद्दीगुडम येथे माता मंदिर बांधकामासाठी माजी जिल्हा परिषद अध्यक्ष तथा सिनेट सदस्य भाग्यश्री आत्राम यांनी आर्थिक मदतकेली . मद्दीगुडम हे आलापल्ली ते एटापल्ली रस्त्यावरील छोटंसं गाव असून याठिकाणी गावकऱ्यांनी माता मंदिर बांधकाम करण्याचे ठरविले.मात्र,मंदिर बांधकाम करण्यासाठी गावातील नागरिकांकडून पाहिजे तितका निधी गोळा होत नसल्याने अडचण निर्माण होत असल्याची बाब भाग्यश्री आत्राम यांना कळताच त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांना पाठवून आर्थिक मदत केली.



# मुलचेरा पोलीस स्टेशन ठरलं जिल्ह्यात सर्वोत्कृष्ट ठाणेदार अशोक भापकर यांच्या कार्याची प्रशंसा






**महेश गुंडेटीवार । गडचिरोली**

पोलीस अधीक्षक निलोत्पल यांच्या संकल्पनेतुन 'कम्युनिटी डेव्हलपमेंट ऑफिसर ऑफ द इयर' हा उपक्रम दरवर्षी राबविण्यात येतो. यानुसार जानेवारी ते डिसेंबर २०२३ या कालावधीत उत्कृष्ट कामगिरीचे मूल्यमापन करण्यात आले.यात कोल्हापूरचे सुपुत्र अशोक भापकर यांच्या उत्तम कामगिरीमुळे मुलचेरा पोलीस ठाणे जिल्ह्यात सर्वोत्कृष्ट ठरले आहे. नक्षलग्रस्त व प्रतिकूल परिस्थितीत खडतर सेवा बजावतानाच त्यांनी गडचिरोली पोलीस दलमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा नागरिकांना लाभ देऊन विविध सामाजिक उपक्रम राबविल्याने त्यांचा पोलीस अधीक्षक निलोत्पल यांच्याहस्ते सन्मान करण्यात आला.

चामोर्शी तालुक्याचे विभाजन करून १५ ऑगस्ट १९९२ ला मुलचेरा तालुक्याची निर्मिती करण्यात आले होते.त्याच दरम्यान तालुक्यात विविध कार्यालय स्थापन करण्यात आले.त्यात मुलचेरा पोलीस स्टेशनची स्थापना झाली.मुलचेरा पोलीस स्टेशन मध्ये एकूण ४२ गावांचा समावेश असून बरेच गावे अतिदुर्गम व आदिवासीबहुल गावे आहेत.एवढेच नव्हेतर याठिकाणी पुनर्वसित बंगाली बांधवांची संख्या देखील अधिक आहे.अश्या परिस्थितीत कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवून पोलिसांप्रति विश्वास निर्माण करण्याचा काम तसेच गडचिरोली पोलीस दलाकडून राबविण्यात येणाऱ्या विविध योजना आणि उपक्रम सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी ठाणेदार अशोक भापकर यांनी मोलाची कामगिरी बजावली.

ठाणेदार अशोक भापकर या अगोदर कोटमी पोलीस मदत केंद्रात २ वर्ष सेवा दिली होती.परत त्यांना ५ मार्च २०२२ ते आजतागायत नक्षलग्रस्त गडचिरोली जिल्ह्यात सेवा देण्याची संधी मिळाली.यादरम्यान त्यांनी पोलीस ठाणेसाठी जागेचा प्रश्न सोडवून सुसज्ज कार्यालय बनवून अख्ख पोलीस स्टेशनचा रूप पालटला.ऑगस्ट २०२२ ते मे २०२३ पर्यंत त्यांनी येथील विविध बांधकाम पूर्ण केले.सोबतच गावात सुसज्ज वाचनालय,ओपन जिम,पोलीस स्टेशन परिसरातील हनुमान मंदिर सुशोभीकरण,पोलीस दादालोरा खिडकी रूम बांधकाम,परिसरात स्ट्रॉबेरी आणि ऊस लागवड, पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण, रोजगार, आरोग्य आणि कृषी मेळावे घेऊन नागरिकांना शासनाचे विविध लाभ दिले. तसेच व्यसनमुक्ती शिबिर घेऊन परिसरात अवैध दारू विक्री होणार नाही आणि अवैध दारूची वाहतूक होणार नाही आणि झाल्यास दारू वाहतूक करणारे आणि विक्री करणाऱ्यांचे मुसक्या आवळले.त्यासोबतच शहरात श्रमदान करून मुख्य चौकात असलेल्या बस स्थानकाचे देखील रूप पालटले. त्यामुळे शालेय विद्यार्थ्यांना आणि प्रवाशांना बसण्याची सोय झाली.या सर्व कार्याची दखल घेऊन नुकतेच १३ जुलै रोजी पोलीस अधीक्षक निलोत्पल यांनी पोलीस मुख्यालयात घेण्यात आलेल्या सन्मान सोहळ्यात 'कम्युनिटी डेव्हलपमेंट ऑफिसर ऑफ द इयर' या पुरस्काराने त्यांचा सन्मान करून प्रशस्तीपत्र व १० हजार रुपये रोख रक्कम देण्यात आले.

## दररोज 'राष्ट्रगीत' अशोक भापकर यांचा अभिनव उपक्रम



ठाणेदार म्हणून कारभार हाती घेतल्यानंतर अशोक भापकर यांनी मुलचेरात एक अभिनव उपक्रम राबविला ते आजही निरंतर सुरू आहे. मुलचेरा शहरात १५ ऑगस्ट २०२२ रोजी त्यांनी सकाळी ८.३० वाजता दररोज राष्ट्रगीत घेण्याचा अभिनव उपक्रम सुरू केला. त्याला नागरिकांनी देखील प्रचंड प्रतिसाद दिला आहे. आजही मुलचेरा तालुका मुख्यालयात राष्ट्रगीताने कामाचा श्रीगणेशा होतो.

तेलंगाना राज्यातील नेलगोंडा या गावात असाच उपक्रम राबविला जातो त्यानंतर महाराष्ट्र राज्यातील भिलवडी येथे सदर उपक्रमाला सुरुवात झाली होती असाच राष्ट्रीय उपक्रम मुलचेरा तालुका मुख्यालयात त्यांनी राबविले. मूलचेरा भारतातील तिसरे तर महाराष्ट्रातील दुसरे गाव आणि गडचिरोली जिल्ह्यातील हे पहिले गाव ठरले आहे.आदिवासीबहुल गडचिरोली जिल्ह्यात दोनदा सेवा करण्याची संधी मिळाली. त्या माध्यमातून गडचिरोली पोलीस दलाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती आणि त्याचा लाभ देण्याचा पुरेपूर प्रयत्न करण्यात आला. मुलचेरा पोलीस स्टेशनचे रखडलेले काम देखील या कार्याकार्यात वरिष्ठांच्या मार्गदर्शनात पूर्ण करण्यात आले. व्यापाऱ्यांच्या न्याय हक्कासोबत सामाजिक कामातही योगदान देण्याच्या हेतूने राष्ट्रगीताने दिवस सुरू करण्याचा उपक्रम राबविण्याची संकल्पना मांडण्यात आली. त्याला एकमताने सर्वजण होकार दिल्याने हा उपक्रम सुरू करण्यात आला. आजही अविरतपणे सुरू असल्याचा अभिमान आहे.

**–अशोक भापकर,ठाणेदार मुलचेरा**

# बुधवारला विठ्ठल मंदिरात अभिषेक आमदार दांपत्य उपस्थित राहणार

**नागभीड । प्रतिनिधी**

आषाढी एकादशी निमित्त स्थानिक विठ्ठल रुक्मिणी मंदिरात गुरूदेव सेवा मंडळाच्या वतीने दिनांक १७ जुलै रोज बुधवार ला सकाळी ५ ते ९ या दरम्यान विठ्ठल मंदिरात अभिषेक कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे . या कार्यक्रमात चिमूर विधानसभा क्षेत्राचे आमदार बंटी भांगडिया सहपरिवार उपस्थित राहणार असून भांगडीया दांपत्य अभिषेक करणार आहे .या कार्यक्रमात पूजा, आरती,भजन, अभिषेक इत्यादी कार्यक्रम घेण्यात येईल.तरी या कार्यक्रमास जास्तीत जास्त गुरूदेव उपसकानी उपस्थित रहावे असे आवाहन गुरुदेव सेवा मंडळाचे उपाशीका पुष्पलता बोरकर यांनी केली आहे.



# इंदापूर मध्ये हिंदू -मुस्लीम ऐक्याचे प्रतिक आज पाहायला मिळणार ;मोहरम सण परंपरेनुसार साजरा होणार

**इंदापूर । दत्तात्रय गवळी.**

इंदापूरचा मोहरम सण हा नगर नंतर पश्चीम महाराष्ट्रात प्रसिद्ध होता व आजही हा सण परंपरे नुसार तेवढयाच पद्धतीने साजरा केला जातो .

पुर्वीच्या काळी शिवकालीन जे साहसी खेळ खेळले जात होते त्या खेळाची पार्श्वभूमी आहे . मोहरमच्या दहा दिवसातील सहा , सात, आठव्या दिवशी मलखांब , दाडपट्टा , तलवारबाजी इ . प्रात्यक्षिक खेळ होत असत तसेच विविध प्राण्यांच्या चित्रांच्या प्रतिकृतीची मिरवणुका निघत असतात.

मोहरमच्या ९ व्या तारखेला कत्तलची रात्र म्हणतात .मोहरम मध्ये या दिवसाला अतिशय महत्व आहे कारण यावेळी हसेन – हुसेन यांचे विषयी आदर भावना म्हणून त्याची आठवण म्हणून हातामधे लाल व पिवळ्या रंगाचा (नाडा ) धागा बांधण्याची प्रथा आजही सर्वधर्मीय भावीक पाळताना दिसतात . या दिवशी गावातील प्रत्येक मोहल्यातून ' सवारी ' निघून ग्रामप्रदिशणे निघून एकमेकांच्या भेटीचा कार्यक्रम होतो . तसेच यावेळी मोहरममधे नवसाचे 'वाघ' होण्याची परंपरा आजही दिसून येते . हिंदू-मुस्लीम एकत्र येऊन हा सण साजरा करत म्हणून या सणाला आगळे वेगळे महत्व होते . यामुळे ऐक्याची भावना दृढ होत असे .

शहरात शेख मोहल्ला , कसबा , ठाकरगल्ली, सातपुडा , बागवान गल्ली , कुरेशी मोहल्ला या विभागात हा सण मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो . या ठिकाणी मानाचे हसेन – हुसेन यांचे प्रतिक ताबूत व सवारी बसवले जातात . यामधे शेख मोहल्ला व कसबा यांना विशेष असे महत्व आहे . शेख मोहल्ला हा थोरला बंधु आणि कसबा हा धाकटा बंधु म्हणून विशेष स्थान आहे .



मोहरमच्या १० व्या दिवशी या दोन भाऊ विसर्जनासाठी निघताना नेहरू चौक येथे यांच्या अविरूमरणीय असा गळाभेटीचा प्रसंग आपल्या डोळ्यात टिपणे साठी हजारो भाविकांचा जनसमुदाय उपस्थित असतो . या भेटी वेळी हायदोस्त – दुल्हा याचा मोठ्या प्रमाणात जयघोष केला जातो .

ताबूतांच्या मिरवणुकी पुढे भाविकांकडून हायदोस्त – दुल्हा खेळला जात असे . दोन्ही भावांची भेटीनंतर एकत्रीत पणे जल्लोषात नेहरु चौकातून मिरवणूक निघते त्यावेळेस हिंदू – मुस्लीम भावीक दोन्ही ताबूतांचे दर्शन घेण्यासाठी एकच गर्दी करतात. पुढे ही मिरवणूक पारंपारिक वाद्य ढोल ताशांच्या गजरात मूख्य रस्त्याने छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे जाऊन विधीवत फातेह खानी करून विसर्जीत होऊन पुढच्या वर्षाच्या भेटीसाठी पुन्हा आपआपल्या जागी जातात अशी माहिती आत्ता यांनी दिली.

# ग्रामीण भागात जिओ 'नॉट रीचेबल ;नेटवर्क करते धरपकड

## नागरिकांनी जिओला केले बीएसएनएल मध्ये पोर्ट

**चिमूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील ग्रामीण भागात जिओ कंपनीचा नेटवर्क प्रॉब्लेम पंधरा दिवसापासून सुरू आहे. नेटवर्क धरपकड करत आहे तर कधी दिवसभर 'नॉट रीचेबल असते . त्यामुळे जिओ च्या ग्राहकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

जिओ कंपनीने आपले सिम व रिचार्ज लाँच केल्यानंतर ग्राहकांना मोफत सिम देऊन भुरळ पाडली. व इतर सिमच्या तुलनेत रिचार्ज दर हा काहीसा परवडणारा असल्याने व जिओ ला भरपूर कव्हरेज असल्याने नागरिकांनी जिओची सिम घेण्याचा सपाटा सुरू केला. व आता जिओचे कस्टमर वाढल्याने कंपनीने नुकतेच आपले रिचार्ज दर वाढवले. त्यामुळे सामान्य गरीब नागरिकांना रिचार्ज करणे कठीण होत आहे. तर दुसरीकडे तालुक्यामध्ये जिओ कंपनीचा कव्हरेज नसल्याने व वारंवार कव्हरेज सोडधर करीत असल्याने ग्राहकांना अतिशय त्रास सहन करावा लागत आहे. या कव्हरेज च्या प्रॉब्लेम मुळे तालुक्यातील नागरिकांची ऑनलाइन ची कामे रखडली असून लिंक फेल मुळे नागरिकांना सेतू केंद्रावर हेलपाट्या माराव्या लागत आहेत. शेतकऱ्यांना पीक विमा योजनेसाठी ऑनलाईन करावे लागत आहे. तर महिलांना मुख्यमंत्री लाडकी बहीण माझी या योजनेसाठी ऑनलाईन करावे लागत आहे. तर बरेच नागरिक उत्पन्ना चे ऑनलाईन प्रमाणपत्र काढण्यासाठी धडपड करीत आहेत. यामुळे शेतकऱ्यांच्या शेतीच्या कामात अवरोध निर्माण होत असून तासनतास लिंक ची वाट पाहत सेतू केंद्रावर बसून राहावे लागत आहे. या सर्व कारणामुळे जिओ कंपनीचे ग्राहक त्रस्त झाले असून जिओ कंपनीने आपली फसवणूक केल्याची भावना ग्राहकांमध्ये निर्माण झाली आहे. त्यामुळे ग्राहकांचा कल आता आपला मोबाईल नंबर जिओ मधून बीएसएनएल कंपनीमध्ये पोर्ट करण्याचा असल्याने बी एस एन एल कंपनीच्या कार्यालयात नागरिकांची गर्दी दिसून येत आहे.

# खा.डॉ.नामदेव किरसान यांच्या वाढदिवसानिमित्त अहेरी विधानसभा क्षेत्रात विविध उपक्रमांनी वाढदिवस साजरा

**गडचिरोली । प्रतिनिधी**

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे जेष्ठनेते व गडचिरोली – चिमूर लोकसभा क्षेत्राचे खासदार डॉ.नामदेवराव किरसान यांच्या वाढदिवसा निमित्त काँग्रेसनेते व माजी जि.प.अध्यक्ष तथा अहेरी बाजार समिती सभापती अजय कंकडालवार व सेवानिवृत्त सहाय्यक वंनसंरक्षक तथा आदिवासी काँग्रेस सेलचे जिल्हा अध्यक्ष हनमंतू मडावी यांच्या मार्गदर्शनाखाली खासदार डॉ.नामदेवराव किरसान यांचा विविध उपक्रमांनी वाढदिवस साजरा करण्यात आला.



यावेळी अहेरी काँग्रेस कमिटीचे पदाधिकारी कार्यकर्ते तसेच जिल्हा अध्यक्ष हनमंतू मडावी यांच्या प्रमुख उपस्थितीत अहेरी उपजिल्हा रुग्णालय येथे रुग्णांना फळ वाटप,नागेपल्ली येथील सेवासदन रुग्णालयात रुग्णांना फळ,बिस्केट वाटप तसेच अहेरी शाळेतील विध्यार्थी – विध्यार्थीना पेन बुक चॉकलेट,अजय कंकडालवार व हनमंतू मडावी यांच्या तर्फे अहेरी विधानसभा क्षेत्रातील गोरगरीब जनतेला साडी वाटप तसेच आर्थिक मदत सुद्धा करण्यात आले.

यावेळी प्रामुख्यानी उपस्थितीत रज्जाक खान पठाण,अहेरी नगरपंचायतचे नगरसेवक प्रशांत गोडशेलवार,स्वप्नील मडावी,चंद्रशेखर बेज्जलवार, भाग्यश्री बेज्जलवार ग्रामपंचायत सदस्य आलापल्ली,हनिप शेख,मधुकर सडमेक अहेरी विधानसभा एस.टी.सेल,सतीश कोरेत,जगताप कोरेत,किशोर सडमेक माजी पेसा अध्यक्ष,जावेद शेख,सतीश मडावी,विनोद मडावी,कोशोर सडमेक,जगपती सडमेक,संतोष येनगंटीवार,सचिन पंचार्य,नरेंद्र गर्गम,कार्तिक तोगम,राकेश सडमेक,प्रकाश दुर्गेसह स्थानिक काँग्रेसचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सर्व यंत्रणांनी पुढील तीन दिवस अत्यंत दक्ष राहून काम करावे-जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

**पंढरपूर । प्रतिनिधी**

आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने वारकरी व भाविकांसाठी सोयीसुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत. मा. मुख्यमंत्री महोदयांनी या सुविधांची पाहणी केली व समाधान व्यक्त केले. तसेच काही ठिकाणी रस्त्यावरील खड्डे बुजवणे, शौचालयाची संख्या वाढवणे, रस्त्यावरील होर्डिंग काढून रस्ते मोकळे करणे व अनुषंगिक सूचना दिलेल्या आहेत. त्याप्रमाणे सर्व संबंधित विभागानी या अनुषंगाने त्वरित कार्यवाही करावी व पुढील तीन दिवस अत्यंत लक्ष राहून आषाढी वारी यशस्वी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले.

भक्तनिवास येथील कॉन्फरन्स हॉलमध्ये आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर आयोजित आढावा बैठकीत जिल्हाधिकारी आशीर्वाद मार्गदर्शन करत होते. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर, महापालिका उपायुक्त आशिष लोकरे, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर, उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, उपविभागीय अधिकारी अमित माळी, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश नवले, मुख्याधिकारी प्रशांत जाधव यांच्यासह अन्य संबंधित विभाग प्रमुख उपस्थित होते.जिल्हाधिकारी आशीर्वाद म्हणाले की, आषाढी वारीनिमित्त दिनांक १७ जुलै २०२४ रोजी माननीय मुख्यमंत्री च्या हस्ते विठ्ठल रुक्मिणीची शासकीय महापूजा होते. यावेळी पंढरपूर शहरात किमान दहा ते पंधरा लाख भाविक येण्याची शक्यता गृहीत धरून प्रशासनाने मागील दोन महिन्यापासून भाविकांसाठी विविध प्रकारच्या सोयी सुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत. मुख्यमंत्री महोदयांच्या सूचनेप्रमाणे यामध्ये काही ठिकाणी बदल तर काही सुविधांमध्ये वाढ करण्याबाबत सांगण्यात आलेले असून त्याप्रमाणे सर्व संबंधित विभागाने अत्यंत तत्परतेने कामे पूर्ण करून घ्यावीत, असे निर्देश त्यांनी दिले.पंढरपूर शहरातील रस्त्यावरील वीज वितरण कंपनीचे पोल तसेच चौका चौकामधील होर्डिंग नगर परिषदेने त्वरित काढून घेऊन रस्ते मोकळे करावेत. तसेच नगर परिषदेने रस्त्यावरील खड्डे त्वरित भरून घ्यावेत. चंद्रभागा वाळवंटातील चेंजिंग रूम ची संख्या वाढवून घ्यावी. ज्या ठिकाणी चिखल झालेला आहे अशा ठिकाणी त्वरित खडी व मुरूम भरून घेऊन पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. शहरात स्वच्छता राखण्यासाठी आधीकचे मनुष्यबळ उपलब्ध करून घ्यावे, अशा सूचना जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिल्या. आरोग्य विभागाने अतिदक्षता विभागात फॅन व कुलरची संख्या वाढवावी. तसेच वाखरी पालखीतळ व ६५ एकरवर आरोग्य सुविधा निर्माण केलेल्या आहेत त्या ठिकाणीही फॅन व कुलरची व्यवस्था करून घ्यावी. रुग्णांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही यासाठी आरोग्य पथके तयार ठेवावीत. दुचाकी वरील आरोग्य दूत सेवा अत्यंत चोख राहील यासाठी दक्ष रहावे. वीज वितरण कंपनीने पुढील तीन दिवस पंढरपूर शहरात वीज पुरवठा सुरळीत राहील यासाठी दक्ष रहावे. पंढरपूर प्रांत अधिकारी यांनी मटन व चिकन शॉप बंद राहतील याबाबत आदेश काढावेत. चंद्रभागा नदीमध्ये बोटी चालवणाऱ्या नाविकांना लाईव्ह जॅकेटचे वितरण करावे तसेच विना जॅकेट नदीमध्ये बोट चालवल्यास संबंधिताची बोट सीज करण्याची कारवाई करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिले.सर्व शासकीय विभाग प्रमुख त्यांच्यावर वारीच्या पार्श्वभूमीवर सोपवण्यात आलेली जबाबदारी व्यवस्थितपणे पार पाडत आहेत. परंतु शेवटचे तीन दिवस महत्त्वाचे असून प्रत्येकाने अत्यंत दक्षपणे दिलेली जबाबदारी पार पाडावी, असे आवाहन त्यांनी यावेळी केले .



# मनसेचं ठरलं ..! वरोरा विधानसभा क्षेत्रात उमेदवार देणार


## पक्षांतर्गत हालचालींना वेग : वरिष्ठांनी घेतला मतदार संघाचा आढावा

### २०१४ ला अनिल बुजोने यांना दिली होती संधी

पूर्वाश्रमीचे शिवसेनेचे असणारे अनिल बुजोने यांना २००९ ला शिवसेनेने तिकीट नाकारले त्यांना डावलून त्यांच्या जागी किशोर डांगे यांना उमेदवारी देण्यात आली होती.त्या निवडणुकीत अपक्ष उमेदवारी दाखल करून त्यांनी लक्षवेधक मताधिक्य घेतले होते पण त्यांना विजय गाठता आला नाही. मनसे आणि शिवसेनेची विचारधारा मेळ घालत असल्याने २०१४ ला बुजोने यांनी मनसेचा झेंडा हाती घेतला . त्यावेळी मनसेचे पदाधिकारी विधानसभा प्रमुख तथा उपजिल्हा प्रमुख प्रवीण सूर हे ही निवडणूक लढण्यास इच्छूक होते पण त्यांना डावलून अनिल बुजोने यांच्या गळ्यात उमेदवारीची माळ टाकण्यात आली आणि पक्षांतर्गत वादाची ठिणगी पेटली. जुन्या पदाधिकाऱ्यांचा पायउतार करून स्वमर्जीतील पदाधिकाऱ्यांची नेमणूक बुजोने यांनी केली होती. त्यामुळे अंतर्गत वाद चांगलाच चव्हाट्यावर आला होता. या निवडणुकीत बुजोने यांना १० हजार मतांचा आकडा ही गाठता आला नाही पण प्रवीण सूर यांनी मात्र पक्षाला राम राम केला होता.

**वरोरा । आशिष घुमे**

सध्या सर्वत्र विधानसभेचे वेध लागले आहे. त्यासाठी सर्वच पक्ष कामाला लागले असून महाराष्ट्र नवनिर्माण सेना ही कामाला लागली आहे . १५ जुलैला मनसेच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी वरोरा व भद्रावती शहरातील पत्रकार,डॉक्टर,वकील, प्रतिष्ठित व्यक्तीच्या भेटी घेऊन आढावा घेतला . नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुका लढवण्यापासून अलिप्त राहिलेली मनसे यंदाच्या विधानसभा निवडणुकीत उतरणार का, हा प्रश्न मनसे कार्यकर्त्यांपासून, विविध राजकीय पक्ष आणि जनतेसाठीही उत्सुकतेचा ठरला होता. काही दिवसांपूर्वी झालेल्या कार्यकर्ता मेळाव्यात मनसे २००ते २५० विधासभा क्षेत्रात उमेदवार देणार असल्याची घोषणा मनसे पक्ष प्रमुख राज ठाकरे यांनी केली होती . त्याला आज (१५ जुलै ) दुजोरा मिळाला .महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे राज्य सरचिटणीस



तथा महाराष्ट्र नवनिर्माण शेतकरी सेनेचे अध्यक्ष संतोष नागरगोजे यांनी वरोरा व भद्रावती दोन्ही शहरातील प्रतिष्ठित नागरिकांच्या भेटी दरम्यान मनसेला मतदार संघ अनुकूल आहे की नाही याची चाचपणी केली व या भागातील मुख्य समस्या जाणून घेतल्या . नागरगोजे यांनी पक्ष प्रमुख राज ठाकरे यांच्या कडे राज्याच्या विकासाचे व्हिजन असून त्यांच्या माध्यमातून महाराष्ट्र शेतकरी सेना शेतकऱ्यांसाठी नेहमी कार्यरत असल्याचे सांगितले . शेती आणि शेतकरी या विषयावर सविस्तर अशी चर्चा झाली.शेतमालाला भाव हे आपल्या हाती नसले तरी उत्पनात वाढ हे आपल्या हातात आहे असे ते म्हणाले . मतदार संघात प्रकल्पग्रस्तांची समस्या मोठी आहे , त्याच सोबत स्थानिकांना रोजगार,प्रदूषणामुळे शेतकऱ्यांचे नुकसान,जंगली जनावरांची समस्या,वेकोलिने कृत्रिम तयार केले मातीचे डोंगर यामुळे परिसरातातील नागरिकांना होणारा त्रास व नुकसान इत्यादी समस्या त्यांच्या नजरेस आणून दिल्या .या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी लवकरच रणनीती आखणार असे ते म्हणाले. हा सर्व आढावा पक्ष प्रमुखांपुढे ठेवणार असून मागील निवडणुकीत पक्षाला मिळालेले मताधिक्य आणि पक्ष व पक्षाचे चिन्ह घराघरात पोहचले असल्याने पक्ष ही विधानसभा लढविणार असे मत त्यांनी चर्चे दरम्यान व्यक्त केले .

### २०१९ ला मनसे कडून रमेश राजूरकर होते उमेदवार

**२०१९ च्या विधानसभा निवडणुकीत वरोरा विधानसभा क्षेत्राकरिता उद्योजक रमेश राजूरकर यांना उमेदवारी देण्यात आली होती .या निवडणुकीत त्यांना ३४ हजाराच्या वर मताधिक्य मिळाले होते. आता त्यांनी भाजपचा शेला गळ्यात घातला त्यामुळे उमेदवार म्हणून पक्ष पदाधिकाऱ्यांना संधी देणार की नेहमी प्रमाणे उमेदवार आयात करणार याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहे.**

# विद्या निकेतन विद्यालयात कायदेविषयक शिबीर

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार किमान समान कार्यक्रमअंतर्गत जिल्हा विधीसेवा प्राधिकरण, लायन्स क्लब व युगल यांच्या संयुक्त विद्यमाने विद्या निकेतन विद्यालया येथे कायदेविषयक शिबीराचे आयोजन करण्यात आले. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका राजश्री गोहकर, लायन्स क्लब युगलचे अध्यक्ष रितेश सागलानी तसेच संस्थेचे विश्वस्त आणि विद्यार्थी उपस्थित होते.



जिल्हा विधी सेवा प्राधिकरण मार्फत वेळोवेळी वेगवेगळया शाळा व महाविद्यालयामध्ये कायदेविषयक जनजागृती व्हावी, म्हणून शिबीर आयोजित केले जातात. मुलांना त्यांच्या संदर्भातील कायदे, हक्क, अधिकार व कर्तव्ये माहित असणे आवश्यक आहे. कार्यक्रमाचे मुख्य वक्ते ३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर तथा बाल न्याय मंडळाचे प्रमुख न्यायाधीश एस.ए. लाडसे, यांनी बाल गुन्हेगारी संदर्भात असलेला कायदा बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) कायदा, २०१५ बाबत सर्व मुलांना उदाहरणासह माहिती दिली. कार्यक्रमाचे दुसरे वक्ते ६ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर एन.आर. गोरले, यांनी मुलांचे अधिकार, शिक्षणाचा अधिकार तसेच बेटी बचाव बेटी पढाव या विषयांवर मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक विशाखा कर्वे यांनी तर आभार मुख्याध्यापिका राजश्री गोहकर यांनी मानले.

# शिक्षण व नोकरी मध्ये अनाथ बालकांना आरक्षण

## अनाथ प्रमाणपत्र मिळविण्यासाठी जिल्हा बाल संरक्षण कक्षात करा सपर्क

**गडचिरोली । प्रतिनिधी**

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ अन्वये काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या अनाथ, निराधार बालकांना जातीचा दाखला नसल्यामुळे विविध शासकीय लाभांपासून वंचित राहावे लागते. त्यामुळे अनाथ मुलांना राज्य शासनाच्या विविध सवलतीचा लाभ घेता यावा तसेच कुटुंबात राहून ज्या अनाथ बालकांचे संगोपन झालेले आहे अशा बालकांना संस्थात्मक व संस्थाबाह्य या नमुन्यात अनाथ प्रमाणपत्र वितरीत करण्यात येत आहे. या नुसार अनाथांना शिक्षण व नोकरीत यामध्ये १ टक्के आरक्षण लागू करण्यात आले आहे.

गडचिरोली जिल्ह्यात आता पर्यंत १५७ अनाथ बालकांना जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयाच्या वतीने अनाथ प्रमाणपत्र वितरीत करण्यात आलेले आहे. विविध विभागांच्या झालेल्या पद भरती मध्ये गडचिरोली जिल्ह्यातील ०५ बालके शासकीय नोकरीवर लागलेले आहेत.

अनाथ आरक्षण पात्रता निकष पुढीलप्रमाणे आहे- संस्थात्मक या प्रवर्गामध्ये ज्यांच्या वयाची १८ वर्षे पूर्ण होण्यापूर्वी त्यांच्या आई वडिलांचे निधन झाले आहे व ज्यांचे शासन मान्यता प्राप्त संस्थामध्ये पालन पोषण झाले आहे(त्यांच्या नातेवाईकाची अथवा जातीची माहिती उपलब्ध असो किंवा नसो) अशा बालकांचा समावेश असेल. संस्थाबाह्य या प्रवर्गामध्ये ज्यांच्या वयाची १८ वर्षे पूर्ण होण्यापूर्वी त्यांच्या आई वडिलांचे निधन झाले आहे व ज्यांचे शासन मान्यता प्राप्त संस्थाबाहेर,नातेवाईकांकडे संगोपन झालेले आहे अशा बालकांचा समावेश असेल.अनाथ प्रमाणपत्रासाठी लागणारे कागदपत्रे- विहित नमुन्यातील लाभार्थी यांचा अर्ज, वडिलांचा मृत्युचा दाखला, आईचा मृत्युचा दाखला, जातीचा दाखला, लाभार्थी बालक यांचे आधार कार्ड, लाभार्थी पालकांचे आधार कार्ड, लाभार्थीचा जन्मदाखला, शाळेत शिकत असल्याचे प्रमाणपत्र (बोनाफाईड)किंवा टी.सी., अनाथ असल्याबाबत ग्रा.प,न.प.यांचे शिफारस प्रमाणपत्र, पासपोर्ट साईजचे फोटो. सर्व कागदपत्रे हे तीन बंच फाईल सह जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, गडचिरोली येथे सादर करावे.

**अनाथ प्रमाणपत्र मिळविण्यासाठी व अधिक माहिती करिता जिल्हा बाल संरक्षण कक्ष, गडचिरोली या कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक -०७१३२२२२६४५ तसेच** Email Id : dcpu. gadchiroligmail. com **यावर किंवा संरक्षण अधिकारी (संस्थात्मक) मोबाईल क्र.९५९५६४४८४८ यावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी प्रकाश भांदककर यांनी केले आहे.**

# आसोलामेंढा तलावातील पाणी शेतकऱ्यांना उपलब्ध करून द्या

## पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे जिल्हाधिकारी, कार्यकारी अभियंता यांना निर्देश

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

यंदाच्या खरीप हंगामात कमी पाऊस आल्यामुळे शेतीला पुरेशा प्रमाणात पाणी पुरवठा झाला नाही. त्यामुळे काही गावांना आसोलामेंढा तलावातील पाणी कॅनॉलद्वारे तातडीने उपलब्ध करून द्यावे, असे निर्देश राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी जिल्हाधिकारी व कार्यकारी अभियंत्यांना दिले आहेत.



मूल व पोंभूर्णा तालुक्यात गावांमधील शेतीला आसोलामेंढा प्रकल्पाच्या माध्यमातून कॅनॉलद्वारे पाणी उपलब्ध करून दिले जाते. या ठिकाणी भाताची शेती मोठ्या प्रमाणात होते. दुर्दैवाने, खरीप हंगाम २०२४ मध्ये कमी पाऊस झाला. त्यामुळे राजगड, भवराळा पासून घाटकुळ आणि दिघोरी पर्यंत गावांमध्ये शेतीला पाहिजे त्या प्रमाणात पाणी मिळाले नाही. अश्यात शेतकऱ्यांचे नुकसान होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे या गावांना जोडणाऱ्या कॅनॉलद्वारे शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी उपलब्ध करून द्यावे, असे मुनगंटीवार यांनी प्रशासनाला दिलेल्या पत्रात नमूद केले आहे.

आसोलामेंढा तलावातील पाणी कॅनॉलद्वारे सोडण्याची कार्यवाही तातडीने करावी, असेही मुनगंटीवार यांनी स्पष्ट केले आहे. जिल्हाधिकारी व आसोलामेंढा प्रकल्पाच्या कार्यकारी अभियंत्यांना यामध्ये स्वतः लक्ष देऊन शेतकऱ्यांचा प्रश्न सोडविण्याचेही निर्देश मुनगंटीवार यांनी दिले आहेत.

# शेतकऱ्यांच्या मदतीला धावुन आला शिवसेनेचा वाघ;शेतकऱ्यांनी मानले संदीप गीऱ्हे यांचे आभार

**मुल । प्रतिनिधी**

पावसाने दडी मारल्याने मूल तालुक्यातील शेतकरी हवालदिल झाले होते. याची माहिती शिवसेना जिल्हाप्रमुख संदीप गिऱ्हे यांना मिळताच त्यांनी शेतकऱ्यांची भेट घेतली संबंधितअधिकाऱ्यांना शेतकऱ्यांच्या व्यथा कथन केल्या व गोसी खुर्द प्रकल्पाचे पाणी सोडण्याचे निवेदन केले जर येत्या काही दिवसात पाणी सोडले नाही तर आंदोलनाचा इशारा दिला पण आंदोलनापूर्वीच मागण्या मान्य झाल्याने

शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले असून शेतकऱ्यांच्या मदतीला धावून आला शिवसेनेचा वाघ असे म्हणत शेतकऱ्यांनी संदीप गिऱ्हे यांचे आभार मानले .

तालुक्यात एकीकडे पावसाने दडी मारली त्यामुळे शेतकरी हतबल झाला आहे,मुल तालुक्यातील काही गावे जसे फिस्कुटी विरई,चीचाळा,हळदी ताडाळा,दहेगाव,भेजगाव हे गावे सिंचनाच्या भरोशावर आपले पिक जगवितात,आणि आपली उपजीविका भागवतात,परंतु सुरुवातीला पाऊस आला आणि मग अचानक मुल तालुक्यात पावसाने दडी मारली,शेतकरी हवालदिल झाला,त्यात शेतकऱ्यांना आपल्या हक्काचा माणूस म्हणून संदीप गीऱ्हे शिवसेना जिल्हा प्रमुख चंद्रपूर यांना भ्रमणध्वनी द्वारे फिस्कुटी येथील माजी सरपंच अनिल निकेसर यांनी संपर्क केला.

शिवसेना जिल्हा प्रमुख संदीप गीऱ्हे यांनी १३ जुलै रोजी थेट फिस्कूटी हा गाव गाठून तेथील शेतकऱ्यांशी संवाद साधून शेतकऱ्यांची परिस्थिती समजून घेत सिंचन विभागाचे अधिकारी यांचे शी भ्रमणध्वनी द्वारे त्वरित संपर्क केला



आणि त्यांना अल्टिमेट दिला की शेतकऱ्यांना गोसी खुर्द प्रकल्पाचे पाणी सोडले नाही तर शिवसेना स्टाईलने आंदोलन करण्यात येईलआणि याची सर्वस्व जबाबदारी आपली राहील अस ठणकावून सांगितले असता १५ जुलै रोजी शिवसेना जिल्हा प्रमुख संदीप गीऱ्हे यांनी आपला ताफा शेतकऱ्यांसोबतघेत सिंचाई विभाग सावली येथे जात असताना सिंचाई विभाग कार्यालयातून संपर्क संपर्क करण्यात आला व आपली मागणी रास्त आहे आणि शेतकऱ्यांचा प्रश्न मार्गी लागला असून १८ जुलै ते २५ जुलै दरम्यान शेतकऱ्यांना सिंचनाची सुविधा देण्यात येईल,प्रत्येक शेतकऱ्यांना पाणी पुरवठा करण्यात येईल अशी माहिती गिऱ्हे यांना अधिकाऱ्यांनी दिली त्यामुळे सर्वांनी आनंद व्यक्त केला . शिवसेना जिल्हा प्रमुख संदीपगीऱ्हे यांचे गावातील फिसकुटी,विरई,चिचाळा, तडाळ,हळदी,गावातील जनतेनी मनापासून आभार मानले.८० टक्के समाज कारण २० टक्के राजकारण हेच शिवसेनेचे ध्येय धोरण या तत्वावर मि काम करत राहील असेमत शिवसेना जिल्हा प्रमुख संदीप गीऱ्हे यानी व्यक्त केले.

# चंद्रपूर हा उद्योगांसाठी आदर्श जिल्हा-जिल्हाधिकारी विनय गौडा

## ‘इग्नाईट महाराष्ट्र - २०२४’ कार्यशाळेचे उद्घाटन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर जिल्ह्यात औष्णिक विद्युत प्रकल्प, सिमेंट कंपन्या, लोहखनीज प्रकल्प, लाईमस्टोनवर आधारीत उद्योग कार्यरत आहे. एवढेच नव्हे तर वनउपजांवर आधारीत उद्योगांनाही जिल्ह्यात अतिशय चांगली संधी असल्यामुळे चंद्रपूर हा उद्योगांसाठी आदर्श जिल्हा आहे, असे विचार जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी व्यक्त केले. नियोजन भवन येथे जिल्हा उद्योग केंद्राच्या वतीने आयोजित ‘इग्नाईट महाराष्ट्र - २०२४’ या एकदिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन करतांना ते बोलत होते. यावेळी मंचावर उद्योग विभागाचे सहसंचालक गजेंद्र भारती, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक ऋतुराज सुर्या, बांबू संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेचे संचालक अशोक खडसे, विकास आयुक्त (उद्योग) दिपेंद्रसिंह कुशवाह, सहसंचालक स्नेहल ढोक, न्यू इंडिया इन्शुरन्स कंपनीच्या उपमहाव्यवस्थापक उमा अय्यर, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक राजू नंदनवार आदी उपस्थित होते.

नवउद्योजकांना संधी, शासनाचे धोरण, उद्योगासाठी लागणा-या सेवा, उत्पादन, मार्केटिंग, आर्थिक व इतर अनुषंगीक बाबींची माहिती होण्यासाठी ‘इग्नाईट महाराष्ट्र - २०२४’ या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे, असे सांगून जिल्हाधिकारी विनय गौडा म्हणाले, चंद्रपूर जिल्ह्यात जवळपास २ हजार मेगावॅटचा औष्णिक विद्युत प्रकल्प, चार ते पाच नामांकित सिमेंट कंपन्या तसेच लोहखनीज प्रकल्प कार्यरत आहेत. उद्योगांसाठी अतिशय चांगले स्त्रोत येथे उपलब्ध असल्यामुळे लोहखनीज आणि स्टील उद्योगांना एक चांगली संधी आहे. एवढेच नव्हे तर जिल्ह्यातील ४२ टक्के भुभाग जंगलव्याप्त असून जगप्रसिध्द ताडोबा - अंधारी व्याघ्र संरक्षण प्रकल्प जिल्ह्यात आहेत. त्यामुळे पर्यटनाच्या दृष्टीने अतिशय चांगली संधी असून जंगलावर आधारीत उद्योग, जिल्ह्यासाठी एक मोठी उपलब्धी होऊ शकते. त्यातून स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.पुढे जिल्हाधिकारी म्हणाले, केवळ मोठे उद्योगच नाही तर कौशल्य विकासाचे एखादे प्रशिक्षण घेऊन छोटे-मोठे दुकान किंवा छोटा उद्योग सुरू केला तरी त्यातून रोजगाराची निर्मिती होऊ शकते. फेब्रुवारी महिन्यात चंद्रपूरमध्ये ‘डव्हाँटेज चंद्रपूर’ हा नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आला. यात जिल्ह्यासाठी ७६ हजार कोटींचे गुंतवणूक करार झाले.



ही आपल्या सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे. ‘इग्नाईट महाराष्ट्र - २०२४’ मध्ये आज येथे उद्योग क्षेत्रातील नामवंत उद्योजक उपस्थित आहेत, या सर्वांच्या अनुभवाचा लाभ नवउद्योजकांनी तसेच इतरांनीसुध्दा घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी केले.प्रास्ताविकात उद्योग विभागाचे सहसंचालक गजेंद्र भारती म्हणाले, ‘इग्नाईट महाराष्ट्र’ उपक्रमाचे हे दुसरे वर्ष आहे. केवळ मुंबई, पुणे, नागपूर या मोठ्या शहरातच नव्हे तर छोट्या जिल्ह्यातसुध्दा उद्योगांना चालना देण्यासाठी असे उपक्रम व्हावे, या उद्देशाने ‘इग्नाईट महाराष्ट्र’ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. केंद्र आणि राज्य शासनाच्या सहकार्यानेच उद्योगांची उभारणी शक्य आहे. त्यासाठी अनेक धोरणात्मक निर्णय घेतले जातात. शासनाने हे एक चांगले व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याचे त्यांनी सांगितले.

### आयटीआयच्या विद्यार्थ्यांना प्रेंटीशीप पत्राचे वाटप :

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील (आयटीआय) विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या उद्योगात रोजगारासाठी प्रेंटीशीप पत्राचे मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आले. यात जगदिश लसंते, श्रध्दा कुमरे, सौरभ आवळे, वैभव घोडमारे, ऋतीक शेंडे, सुषमा कासवटकर, विष्णु पदमाईकर, रिया पिपरीकर, मंथन दारुनकर, टेकचंद बोम्मई, धनश्री मेश्राम, मोहित निकुरे, सुरज झोडे, पियुष श्रीवस्कर, सुगत खोब्रागडे आदींचा समावेश होता. यावेळी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, चंद्रपूरचे प्राचार्य राजरत्न वानखेडे तसेच सहायक प्रशिक्षणार्थी सल्लागार प्रणाली दहाटे उपस्थित होत्या.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .